**ठळक बातम्या**

- अमली पदार्थांबाबत राज्य सरकारचं धोरण शून्य सहिष्णुता असल्याचं मुख्यमंत्र्याचं विधानसभेत प्रतिपादन

- चालू आर्थिक वर्षासाठी ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेत सादर

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवस राज्याच्या दौऱ्यावर

- बिनचूक मतदार याद्या हा लोकशाहीचा पाया असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्तांचं प्रतिपादन

- चालू हंगामात कापूस खरेदीला मुदतवाढ देण्याची आमदार सुधीर मुनगंटीवार यांची मागणी

**आणि**

- राज्यात वेगवेगळ्या रस्ते अपघातात ६ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

अमली पदार्थांबाबत सरकारचं शून्य सहिष्णुता धोरण आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. अमली पदार्थांची तस्करी करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधले जात आहेत, कुरिअरद्वारे अमली पदार्थ पाठवले जात असल्याचं आढळून आलं असून अशा कुरिअरवर कारवाई केली जाईल, अमली पदार्थ विक्रीत दोषी ठरलेल्या पोलिसांना बडतर्फ केलं जात आहे असंही त्यांनी सांगितलं…..

- **- होल्ड - बाईट फडनवीस - -**

मकोका अंतर्गत अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांची मालमत्ता जप्त करता येते असं ते म्हणाले. नसीम खान, वरूण सरदेसाई यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

डिजिटल अटक नावाची कोणतीही तरतूद कायद्यात नाही, त्यामुळे असा फोन आल्यास तो खोटेपणा आहे, असं समजावं, असं मुख्यमंत्र्यांनी आज प्रश्नोत्तराच्या तासात स्पष्ट केलं. ते विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाला उत्तर देत होते.

- **- होल्ड - बाईट फडनवीस - -**

अशा प्रकरणात एक नऊ तीन शून्य (१९३०) या क्रमांकावर लगेच तक्रार करावी. असं ते म्हणाले. त्याआधी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी डिजिटल अटकेबद्दल राज्य सरकार राबवत असलेल्या जनजागृतीविषयी माहिती दिली. समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी आणि आशुतोष काळे यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता.

**<><><><>**

नियमांचं वारंवार उल्लंघन करणाऱ्या, राज्यातल्या ऑर्केस्ट्रा बारचे परवाने कायमचे रद्द केले जातील, यासाठी सुधारणा विधेयक या अधिवेशनात किंवा पुढच्या अधिवेशनात आणलं जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. न्यायालयानं महिलांना बारमध्ये काम करण्याची परवानगी दिली आणि सरकारनं नियम अधिक कठोर केले. तरीही पनवेलसारख्या भागांत नियमभंगाच्या तक्रारी येत आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><>**

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातल्या कामकाजासाठी तालिका अध्यक्षांच्या नियुक्तीची घोषणा आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत केली. योगेश सागर, संजय केळकर, दिलीप लांडे, चंद्रकांत नवघरे, सुनिल प्रभू, राजू खरे, अमित झनक आणि समाधान आवताडे हे तालिका अध्यक्ष म्हणून काम पाहतील.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज चित्रा वाघ, कृपाल तुमाने, विक्रम काळे, राजेश राठोड, सुनील शिंदे यांची तालिका सभापती म्हणून घोषणा केली. त्यापूर्वी प्रज्ञा सातव यांचा विधान परिषद सदस्य पदाचा राजीनामा मंजूर केल्याची घोषणा त्यांनी केली.

**<><><><>**

मराठवाडा, विदर्भासह कोकणाच्या अनेक भागांत काल अवकाळी पावसामुळे झालेल्या पीक नुकसानाचं सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले जातील असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत सांगितलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे यांनी स्थगन प्रस्तावाच्या सूचनेत हा मुद्दा उपस्थित केला. तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी वडेट्टीवार आणि मुंडे यांनी केली.

**<><><><>**

अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी करत आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनात धरणं आदोलन केलं. या सदस्यांनी यावेळी भाजपाच्या नेतृत्वाखालच्या महायुती सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप करत घोषणाबाजीही केली. मंत्रालयातल्या झिरवळ यांच्या विभागातल्या कारकुनाला लाचखोरीच्या आरोपावरुन या महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं अटक केल्यामुळे झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी लावून धरली आहे.

<><><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली तूट भरून काढण्यासाठी पुरवणी मागण्या कमी ठेवण्यात आल्या आहेत. कृषी पंप आणि यंत्रमागावरल्या अनुदानासाठी ३ हजार ११२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांसाठी ८०३ कोटी प्रस्तावित आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यावर ९ कोटी ३२ लाख रुपये कर्जाचा बोजा वाढण्याचा अंदाज यात वर्तवण्यात आला आहे. मुख्यमंत्री ६ मार्चला राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर फडणवीस यांनी अर्थ खातं सांभाळलं आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. मुंबईत लोकभवन इथं हिंदुजा हॉस्पिटलनं आयोजित केलेल्या 'जीवरक्षण आणि तंदुरुस्त भारताची निर्मिती' या देशव्यापी मोहिमेचं उद्घाटन आज राष्ट्रपतींच्या हस्ते होईल. त्यानंतर उद्या त्या शेगाव इथं केंद्रीय आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या राष्ट्रीय आरोग्य मेळ्याला उपस्थित राहणार आहेत. नागपूरमध्ये ब्रह्माकुमारींनी आयोजित केलेल्या 'एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचं सुवर्णयुग' उपक्रमाच्या उद्घाटन समारंभलाही त्या उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर त्या झारखंडला जाणार आहेत.

<><><><><>

बिनचूक मतदार याद्या कोणत्याही देशाच्या लोकशाहीचा पाया असल्याचं प्रतिपादन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथे भरलेल्या केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयुक्तांच्या राष्ट्रीय गोलमेज

परिषदेला संबोधित करत होते. देशातल्या अपात्र मतदारांना वगळून फक्त पात्र मतदारांना मतदार यादीत समाविष्ट करता यावं, यासाठी मतदार याद्या विशेष सखोल पुनरिक्षणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सध्या १२ राज्यात पुनरीक्षण सुरू असून त्यापैकी ११ राज्यांनी त्यांच्या मतदार याद्या जाहीर केल्या आहेत, असं ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत देशाची अर्थव्यवस्था ८ पूर्णांक १ दशांश टक्के वेगानं वाढल्याचा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या आज प्रसिद्ध झालेल्या संशोधन अहवालात व्यक्त केला आहे. गेल्या ३१ डिसेंबरला संपलेल्या तिमाहीत आर्थिक कामकाज लवचीक राहिल्याचं उच्च वारंवारता निर्देशांकांवरून दिसून येत असल्याचं यात म्हटलं आहे. कृषी आणि बिगर कृषी या दोन्ही क्षेत्रातला ग्रामीण भागातला खप मजबूत राहिल्याचं, तर शहरी भागातला खप गेल्या सणासुदीच्या हंगामापासून स्थिर गतीनं वाढत असल्याचं अहवालात नमूद केलं आहे.

<><><><><>

चालू हंगामात कापूस खरेदीला मुदतवाढ देण्याची मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. अतिवृष्टीमुळे कापूस काढणीला अनेक ठिकाणी उशीर होत असून, राज्यातला कोणताही कापूस उत्पादक शेतकरी किमान आधारभूत किंमतीपासून वंचित राहू नये, यासाठी २७ फेब्रुवारीला संपत असलेली ही मुदत येत्या ३१ मार्च वाढवावी, असं मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. भारतीय कापूस महामंडळाचे अध्यक्ष ललितकुमार गुप्ता यांच्याकडेही मुनगंटीवार यांनी ही मागणी पत्र लिहून केली आहे.

<><><><><>

राज्यात मराठवाड्यात काल झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे काढणीला आलेल्या रब्बी पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. फळबागांनाही या अवकाळी पावसाचा तडाखा बसला असून आंबा पिकाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

राज्यात आज तीन ठिकाणी झालेल्या रस्ते अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला.

अहिल्यानगर इथं आज पहाटे ट्रकने गाडीला धडक देऊन झालेल्या अपघातात चौघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तिघांचा समावेश आहे.

**नंदुरबार जिल्ह्यात** नवापुर तालुक्यात विसरवाडी गावाजवळ गाडीवरील नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात चालकाचा उपचारावेळी मृत्यू झाला. पोलिसांना  अपघातग्रस्त गाडीत देशी दारुच्या बाटल्या आढळून आल्या.

उसाने भरलेल्या ट्रॅक्टरखाली दुचाकी आल्यानं ३६ वर्षांच्या व्यक्ती मृत्यू झाला. हा अपघात **बीड जिल्ह्यात** गोराई तहसील इथं झाला.

**//<><><><><>//**